दिवाकर कारखानीस यांस,

ब-याच जागृत तळमळीनं तुम्ही बरंच काही सांगण्याचा यत्न करता, कुणाचीही अवहेलना न करता.

उपक्रम स्तुत्य आहे, तुम्ही जणू ब्लॉग निर्मिती करून मराठी मनाना परिसंवादात भाग घेण्यास प्रवृत्त करीत आहात.

खूप उत्साह आहे ठिकठिकाणच्या आपल्या कार्यकर्त्यांत.हौस आहे मराठी माणसाना अधिवेशनाला जाण्याची. पण अनेक कारणांमुळं जाणं होत नाही. अनेकाना खर्च जाचक वाटतो.आणि गेलं तर कार्यक्रमही ऊत आल्यागत,पण गिरवलेल्या कित्त्यागत तेच ते असतात. .कारण एकच.करण्या-याना पूर्वी न झाला इतका भव्य कार्यक्रम करावासा वाटतो आणि ते स्वतःची अवास्तव अस्मिता पणाला लावतात. चार माणसं भेटतात, पण वरात वा-यावरची असते.कुणाला कुणाशी मनसोक्त बोलताही येत नाही.

नव्या शहरानं सुपारी उचलली की समित्याना उधाण येते. हौशी कार्यकर्ते जमवले जातात, पण सूत्र अडकतात निधी निर्मितीच्या शृंखलांत.पैसाच अखेरी बोलतो.

पण पैसेच कमी जमवले तर?

कशाला हवीत वेगळी व्यवसाही सेमिनारस्? सर्वांच्या समस्या परिसंवादात त्याना स्थान द्यावे. उगाच टॅक्स ब्रेक देण्या त्यांच फालतू नियोजन कशाला? सांगा की सा-याना तुमच्या समस्या वा लाभयोजना.उद्बोधक होऊ द्यात त्या इतराना. सर्वांच्या सहभागात जाणत्याना महत्व द्या.दोन तासांत आवरता येईल सारे.

जरूर करा तुमच्यापरीनं उत्सवाची नांदी.करा कुशलतेनं साकारलेले लोकल नाटय आणि नृत्य संगितिका, पण द्या त्याला इथल्या जीवनाचा आधार. करा अखेरी यथायोग्य सांगता, पण येऊद्या सा-यात अमेरिकेतील मराठी अस्मिता. सोबतीला घ्या इथल्या अन्य शहरातले कार्यक्रमं. बसवा आपल्याला आपल्या गोलांकारात, पसरवा आपला हंसरा उत्साह.

हे ध्यानात राहुद्या की आपल्या भारतीयांच्या समस्या मुलभूत मराठी अशा नाहीत.संमेलनात त्यांची वाच्यता होऊ शकेल फारतर. युवाभेटी आवश्यक मानून करा त्यांचे नियोजन बाजूच्या छोटया सभागृहात. तिथेच ठेवा उरल्या वेळी ग्रंथभांडार आणि पाणपोई.

मुख्य सभागृहांत होऊ द्या इतर सारे कार्यक्रम, सर्वांना पाहाण्याला. नकोत मराठी मंत्री, असला तर असावा एखादा सन्मान्य साहित्यिक पाहुणा.

नकोत तिथली नाटके ज्यांचा आपल्या इथल्या मराठी संस्कृतीशी सुतराम संबंध नाही. जमवा सांस्कृतिक नाते इथल्या अन्य भारतियांशी. आपले रोटीबेटी व्यवहार वाढलेले आहेत.

इथल्या रितीभातीही जाणून घेणे महत्वाचे आहे, नाहीतर विसरतील तुम्हाला तुमचीच नातवंडे.घ्या त्यांच्याकडून धडे. द्या त्यांच्या कार्यक्रमाला प्राधान्य.

अशा दोन जोडल्या सभागृहांत भरवा पुढचे संमेलन.निर्मा नवं मार्गक्रमण... झालं ते गेलं...इथल्या अनेक गंगेत न्हालं. होऊद्या त्याचं विस्मरण...

विजय पाठारे
अरिझोना.